# ❖ जोखीम व्यवस्थापण धोरण

**(Risk Management Policy)**

**सन.२०२२-२०२३**

## प्रस्ताविक-

बँकेचे दैनंदिन व्यवहार सुरळीत ठेवणेसाठी ब-याच जबाबदा-या स्विकाराव्या लागतात दैनंदिन व्यवहारात अनिश्चिततेच्या परिस्थितीतून जाऊन काम करावे लागते. त्यासाठी क्रेडिट रिस्क, मॅनेजमेंट व ऑपरेशनल रिस्क, लिक्कीडीटी रिस्क, मार्केट रिस्क,इंटरेस्ट रिस्क,लिगल रिस्क इ.चा सामना करावा लागतो व या दिव्यातून वाट काढून दैनंदिन व्यवहार सुरळीतपणे ,अव्याहतपणे नप्यातोटयाचा विचार करून करावे लागतात. त्यामुळे बँकेने खालील प्रमाणे धोरण ठरविले आहे.

१) **लिक्वीडीटी रिस्क(Liquidity Risk)-**: रिझर्व्ह बँक वेळोवेळी रोखता तरलतेचे प्रमाण ठरवून देत असते. त्याचप्रमाणे निधीचे प्रमाण व्यस्त होणार नाही याची दक्षता घेऊन कॅश तसेच निरनिराळया बँकेतील करंट खातेवरील शिल्लक आर.बी.आय.ने ठरवून दिलेल्या प्रमाणात ठेवणेची आहे. तसेच गरजेप्रमाणे निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे एस.एल.आर. व नॉन एस.एस.आर. एक्सपोजर गुंतवणुकीचे प्रमाणात उल्लघंन होणार नाही याची दक्षता घेऊन आर.बी.आय. च्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे गुंतवणुक धोरण राबविणेचे आहे. अशी रिस्क अवलंबिली जात असताना सी.आर.आर.,एस.एल.आर.चे प्रमाण व्यस्त होणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

२) **इंटरेस्ट रेट रिस्क(Interest Rate Risk)-**: व्याजदराचा परिणाम डायरेक्ट नफा तोटयाशी असलेने ठेवी घेणे व अतिरिक्त निधीचे योग्य व्याजदराने योग्य वेळी उपलब्धता पाहून तसेच बँकेच्या नप्याचा विचार करून स्थानिक बाजारपेठेतील इतर बँकांच्या तुलनेत आपल्या बँकेच्या ठेवी व कर्जाचे व्याजदार ठरविणेचा आहे यामध्ये बँकेच्या गुंतवणुकीचा डायरेक्ट नफा तोटयाशी संबंध असलेने सदरचे धोरण कर्जाचा सी.डी.रेशो ६५ ते ७० टक्के पर्यत राखणेसाठी वेळोवेळी स्थानिक बँकातील

व्याजदराचा आढावा घेऊन तसे धोरण ठरविणेचे आहे. यासाठी रोखता,तरलता, व नफा क्षमता या त्रिसुत्रीचा अवलंब करणेचा आहे. त्याप्रमाणे व्याजदर ठरविणेचे आहे.

३) **क्रेडीट रिस्क (Credit Risk)**-: बँकेकडील निधी कर्जरूपाने गुंतवणुक करताना एक्सपोजर लिमीट मर्यादित ठेऊन आर.बी.आय. कडील व सहकार खात्याकडील सुचना व मार्गदर्शक तत्वे,नियम यांचे तंतोतंत पालन करणेचे आहे. कर्जे देतांना तारण,कारण व परतफेड क्षमता या त्रिसुत्रीचा अवलंब करून जास्तीत जास्त सुरक्षित कर्जे अदा करतांना वसुली कमिटीद्धारा प्रभावी नियंत्रण ठेवून वसुलीवर विशेष लक्ष देवून थकबाकी राहणार नाही त्यामुळे बँकेच्या नफा क्षमता तसेच एन.पी.ए.मुळे बँकेचा समतोल बिघडणार नाही याची दक्षता घेणे.

४) **मॅनेजमेंट रिस्क / ऑपरेशनल रिस्क (Management Risk / Operational Risk)** –: बँकेने घेतलेल्या ठेवीची गुंतवणुक रोखता ,तरलता व नफा क्षमता पाहून तसेच सी.आर.आर.,एस. एल. आर. चे योग्य प्रमाण राखून अतिरिक्त निधी सक्षम व योग्य ठिकाणी गुंतविणेची जबाबदारी मॅनेजमेंटवर आहे तसेच अतिरिक्त निधी शिल्लक राहिलेने नफ्यावर अनिष्ट परिणाम होणार नाही तसेच सी.डी.रेशो ७० टक्के पेक्षा जादा होणार नाही. याची वेळोवेळी पहाणी करणेसाठी फंडस मॅनेजमेंट कमिटी,ॲसेट लायबलिटी कमिटीने दरमहा आढावा घेऊन सी.आर.आर. डिफॉल्ट होणार नाही यावर विशेष लक्ष देणेचे आहे. तसेच स्थानिक बाजारपेठेतील बँकांच्या तुलनेत व्याजदर समतोल राहतील याची दक्षता घेणे. आर.बी.आय.कडील मार्गदर्शक सुचना नुसार सरकारी कर्ज रोख्यात गुंतवणुक करणे,त्यावरील ट्रेडींगवर लक्ष राहणेसाठी मा.चेअरमनसो किंवा मा.संचालक मंडळ यांचे सुचनेनुसार व गरजेप्रमाणे डिल नोटवर सहीचे अधिकार देणेत यावेत.

५) **लिगल रिस्क (Legal Risk)** –: आर.बी.आय.कडील मार्गदर्शक सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होते कि नाही यावर विशेष लक्ष देणेसाठी कमिटी मार्फत दरमहा रिव्हयु घेणे. यासाठी बँकेचे अंतर्गत लेखापरीक्षक यांची नियुक्ती करून त्याची वेळोवेळी तपासणी करून दिलेल्या रिपोर्टची गांभिर्याने नोंद घेणे त्याप्रमाणे अंतर्गत नियंत्रण करणे इ.बाबीचे कायदेशिररित्या पालन होत असलेबाबतचे नोंद ऑडीट कमिटीने घेणेची आहे. बॅसल दोन कमिटीच्या सुचनेप्रमाणे कंट्रोलिंग करणेचे आहे.

येणेप्रमाणे “बँकेचे जोखीम व्यवस्थापण धोरण” **(Risk Management Policy)** तयार केले असून सदर धोरणामध्ये गरजेनुसार आवश्यक ते बदल करणेचा अधिकार मा.संचालक मंडळास राहील. तसेच सदर धोरणामध्ये दरवर्षी आढावा घेणेत येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी

कार्यालयीन (ऑफीस) शिफारशीप्रमाणे तयार केलेले “बँकेचे जोखीम व्यवस्थापण धोरण” **(Risk Management Policy)** २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता सभे मध्ये सविस्तर वाचन व विचार होऊन

मासिक संचालक मंडळ सभा क्र.0२ दि.२४/0५/२०२२ ठराव नं.३४ अन्वये मंजूरी देणेत आली.

चेअरमन